सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १०८ ठ. क्र. १४८ दि. २२।८।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

उजनी धरण उद्‌भव धरुन NTPC द्वारा सोलापूर शहर व प्रकल्पग्रस्त गावांकरिता राबविणेत येणा-या पाणी पुरवठा योजनेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव रक्कम रु. १२४० कोटीची सुधारीत पाणीपुरवठा योजनेतील अंशत:/भागश: कामे NTPC कडून प्राप्त होणा-या अर्थसहाय्यातून करणेसाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३१४, दिनांक १९-०१-२०१५ अन्वये मान्यता देवून आवश्यक ती कार्यवाही व पत्रव्यवहार करणेस मा.आयुक्त यांना अधिकार देणेत आलेले आहेत. NTPC व महापालिका अधिकारी यांचेसोबत वेळोवेळी झालेल्या सभेतील चर्चेनुसार व निर्णयानुसार करारनामा मसुदा केला आहे. सदर करार मसुदा अटी/शर्तीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ११-६-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.याकामी वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल म.न.पा.कडे सादर करणेत यावा.

(signature)

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्राथमिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.११० ठ. क्र. १४६
दि. २२/८/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



उजनी धरण उद्‌भव धरुन NTPC द्वारा सोलापूर शहर व प्रकल्पग्रस्त गावांकरिता राबविणेत येणा-या पाणी पुरवठा योजनेच्या ६३.०० MCum (2.22 TMC) पाणी आरक्षणाच्या प्रस्तावाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद सर्व बाबी विचारात घेता र.रु. ९२.२८ कोटीचे बंध पत्र सादर करणेस तसेच सो.म.पा.कडील थकबाकी र.रु. ६०९.०३ लक्ष पाटबंधारे खात्याकडे भरणे इ. बाबतचे धोरण ठरविणेकामी मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-७-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

परंतू बंधपत्र व थकबाकीची रक्कम क्षमापीत होणेकामी मा. शासनास विनंती करणेत येत असून, याकामी सदरची रक्कम क्षमापीत करुन घेणेकामी मा. महाराष्ट्र शासनाकडे वेळोवेळी आवश्यक तो पत्रव्यवहार करणेकामी मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~ग्रामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. १४० ठ. क्र. १४९
दि. २२/८/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना (उजनी धरण उद्‌भव) व सुधारणा सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा (उजनी धरण उद्‌भव) व सुधारणा करणे योजनेचे फेज-१ चे सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) (र.रु. ६९५ कोटी) मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव, सदरचा प्रकल्प अहवाल मा. राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (सुधारीत) अंतर्गत योजनेत समाविष्ठ करणेस या महाअभियानाच्या वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे प्रकल्प किमतीचा ३० टक्के म.न.पा. हिस्सा (र.रु. २०८.४६ कोटी) भरणेस तयार असलेबाबत, तसेच सुधारीत शासन निर्णय दिनांक २१-८-२०१४ नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत विहीत केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणेबाबत, बंधनकारक व वैकल्पीक सुधारणा (Reforms) राबविण्यांस महानगरपालिका तयार असल्याबाबतचा, तसेच मा. केंद्र अथवा मा. राज्य शासनाची नव्याने जी कोणती योजना येईल त्या योजनेमध्ये सहभाग नोंदविणेचा व त्या अनुषंगीक सर्व कार्यवाही ठेवणेचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्तांना देणेकामी आवश्यक म.न.पा. हिस्सा एन.टी.पी.सी. योजनेतून तरतूद होणेस्तव व याकामी आवश्यक तो पत्रव्यवहार करणेस संपूर्ण अधिकार मा. आयुक्तांना देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. १७-७-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. याकामी वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल म.न.पा.कडे सादर करणेत यावा.

Certified P.P.

प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेत ठ.अ. १०८ ठ. क्र. १४०
दि. २२/८/१५ रोजी वरील प्रमाणे ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नेहरु नगर स. नं. ५९६ (भाग) या जागेतील आ.क्र.९/७२ म्युनिसिपल स्टाफ क्वॉर्टर्स ऐवजी एस.टी. बसडेपो असे आरक्षणात फेरबदल करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार असलेले आ.क्र.९/७२ म्युनिसिपल स्टाफ क्वॉर्टर ऐवजी एस.टी.बस डेपो व सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ याप्रमाणे आरक्षणात महाराष्ट्र प्रादेशिक, नियोजन व नगर रचना, अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करण्यास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १३-६-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी आरक्षणाची दोन एकर जागा सिटी बस डेपोसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/~~प्रामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...१३६...ठ. क्र....१४१...
दि...२२/८/१५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



आय.एच.एस.डी.पी अंतर्गत भगवान नगर झोपडपट्टीतील घरकुले बांधणे व परिसर सुधारणा करणे या कामाचे सुधारीत पुर्वगणनपत्रकास मंजुरी मिळणेबाबत प्रस्तावात सविस्तर नमुद केल्याप्रमाणे १) मुळ मंजुर पुर्वगणनपत्रक र.रु.-७,९५,४०,३२६/- २) बदलामुळे होणारी वाढ र.रु.- ८,३०,३३८/- ३) एक्स्ट्रा आयटेमसची वाढ र.रु.- ८०,७२,२३७/- ४) क्वॉटीटी वाढीमुळे वाढ र.रु.- ८७,२६,२४४/- ५) आता प्रस्तावित सुधारित पुर्वगणनपत्रकास र.रु.९,७१,६९,१४५/- यांस नगरअभियंता यांनी प्रस्तावित केल्या प्रमाणे विषयातील कामाचे सुधारीत पुर्वगणनपत्रकांस मा.स्थापत्य समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यास मा.आयुक्त यांचे दिनांक ०२/०७/२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ५१, दिनांक १४-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature) P.A.
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र. १३१ ठ. क्र. १४२
दि. २४/७/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र.४६ इंदिरा नगर, आनंद नगर, शांती नगर, हरळया नगर येथे पाण्याचे पाईपलाईन घालणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्रं-१२/सन २०१५-१६ र.रु.३९,९९,५६५/- यांस मा.स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.१३/०६/२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ३९, दिनांक १४-७-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

प्र नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेचे क्र. ज १०० ठ. क्र. ९५३
दि. २२/८/१५ रोजी ठरला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१००

सोलापूर शहरामध्ये माटे गार्डन येथे विविध सुधारणा करणे (फेज-२) प्रस्तावात नमूद कारणास्तव व पहिल्या फेज मधील कामे पूर्ण होवून सुध्दा अर्धवट सुशोभिकरण होणार असलेने, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे १) एन्टरन्स आर्च २) टॉयलेट ब्लॉक ३) स्टेज ४) एरीगेशन सिस्टीम ५) हॉर्टीकल्चर इत्यादी कामाचे पूर्वगणनपत्र क्र. २१/२०१५-१६ र.रुपये ७४,९३,०८४/- यांस प्रस्तावात नमूद प्रमाणे बजेट तरतूद उपलब्ध होवून मिळणेस उद्यान समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ४-६-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. मंडया नि उद्यान समिती ठराव क्र. ३, दिनांक ८-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature) PP.
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/~~चालुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.नं. १३५ ठ. क्र. २५८
दि. २२/८/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



नटराज थिएटर ते गवई पेठ ते २५६ गाळा ते आडम साईकल मार्ट ते कमला बँक येथे ड्रेनेज लाईन घालणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २४/२०१३-२०१४ र.रु. ३०,५७,८२७/- यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १२-७-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature)
प्र नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 139 ठ. क्र. 155
दि. 22/8/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



टी.पी. १, फा. प्लॉ. नं. १२, १३ पैकी १ एकर जागा भावसार क्षत्रिय समाजाच्या स्माशानभूमीसाठी जागा देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२७, दिनांक १४-२-२०१४ अन्वये सोलापूर महानगरपालिका हद्दीत जवळपास दिड ते दोन लाख भावसार समाजाची लोकसंख्या आहे. त्यांच्या अंत्यविधीचा प्रश्न बिकट झालेला असून, अक्कलकोट रोड पाण्याच्या टाकीजवळ शांती चौकालगत असलेल्या सार्वजनिक स्मशानभूमीच्या जागेतील टी.पी.एक फा.प्लॉ.नं. १२,१३ पैकी दोन एकर जागा भावसार क्षत्रिय समाजाच्या स्मशानभूमीसाठी श्री. हिंगुलांबिका देवी देवालय ट्रस्ट या नावाने देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन होऊन, टी.पी. एक फा.प्लॉ.नं.१२,१३ पैकी एक एकर जागा भावसार क्षत्रिय समाजाच्या स्मशानभूमीसाठी श्री. हिंगुलांबिका देवी देवालय ट्रस्ट या नावाने देण्यास मान्यता देणेत येत आहे. असा ठराव पारित करण्यांत आला होता. सदर ठरावास अनुसरुन सदर ठरावात अर्जदार संस्थेस सदर जागा भाडयाने देणे/विकत देणे/नाममात्र भाडयाने देणेबाबत उल्लेख केलेले नाही म्हणून अर्जदार संस्थेस देणेच्या अनुषंगाने समाजातील नागरिकांचे विचार होऊन व महानगरपालिकेचे आर्थिक हिताचे दृष्टीने पुनश्च विचार होणे आवश्यक आहे. मा. सहा. संचालक यांनी सदर जागेची सन २०१४ चे शासकीय शिघ्रसिध्दगणक दराने किंमत र.रु. १,७६,००,०००/- (एक कोटी श्याहत्तर लाख मात्र) इतके मुल्य निश्चित करुन दिलेले आहे. सदर संस्थेस या जागेवरुन कोणत्याही प्रकारचे आर्थिक उत्पन्न होणार नाही व तसेच सदर जागेचे आरक्षणानुसार हिंदू स्मशानभूमी या आरक्षणाकरिताच वापर होणार आहे. यास्तव यापूर्वी मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावात अर्जदार संस्थेस जागा भाडयाने देणे/विकत देणे/नाममात्र भाडयाने देणे/दिर्घमुदतीच्या कालावधीकरिता जागा देणे याबाबत कोणत्याही प्रकारचे निर्णय ठरावात नमूद केले नाही. तरी याबाबत कोणत्या प्रकारे पुढील कार्यवाही ठेवावी याबाबत पुनश्च धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे असे आम्हास वाटते. सदरचे प्रकरण मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ चे पोटकलम ब व क नुसार मा. सर्वसाधारण सभेचे धोरणात्मक निर्णयास्तव ठेवणेस मा. आयुक्त यांचे दि. १६-७-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरकामी २९ वर्षे ११ महिने नाममात्र १ रुपया प्रमाणे भाडयाने देणेस मान्यता देणेत येत आहे. सदरची जागा स्मशानभूमीसाठी राखीव असून, त्याच कामासाठी वापर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(signature)
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/वार्षिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..125..ठ. क्र...256
दि..22.8.95....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. युसूफ फत्तेवाले वय वर्षे ६५ राहणार पंजाब तालीम, सोलापूर हे गरीब व कष्टाळू असून यांना कोणाचाही आधार नाही. यांना उत्पन्नाचे कुठलेही साधन उपलब्ध नाही. यांची आर्थिक परिस्थिती खूपच गरिबीची आहे. तसल्यातच त्यांना कर्करोगाने ग्रासले असून त्यांच्यावर उपचार चालू आहे. पुढील उपचारासाठी व शस्त्रक्रियेसाठी अंदाजे र.रु. ५.०० लाख खर्च अपेक्षित आहे. तरी त्यांच्या आजारावर शस्त्रक्रिया करणेसाठी व औषधोपचार करणेसाठी र.रु. १.०० लाखाची आर्थिक मदत देणेसाठी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

(signature)
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १२६ ठ. क्र. १५५
दि. २२।८।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सुरवसे राजेश खंडू रा. प्लॉट नं. ७/७६ विष्णू मिल चाळ, सोलापूर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे. व ते बंद लक्ष्मी विष्णू मिलचे कामगार आहेत. त्यांचा मुलगा चि. रोहन राजेश सुरवसे वय वर्षे ६ याचे -हदयास छिद्र असल्याने त्याच्यावर अश्विनी सहकारी रुग्णालय, उत्तर सदर बझार, सोलापूर येथे उपचार चालू आहे. त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे. तसेच चि. रोहन राजेश सुरवसे हा मतिमंद मुलगा आहे. श्री. सुरवसे राजेश खंडू हे अत्यंत प्रामाणिक व कष्टाळू आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांना सोलापूर महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त आर्थिक वैद्यकीय मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

Sd/- P.P.
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १४६ ठ. क्र. १५८
दि. २२/८/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



जुना सिटी सर्व्हे नं. ३१० नविन सिटी सर्व्हे नं. १३३/१ ही जागा ओपन स्पेससाठी आरक्षित आहे. सदरची जागा रहिवास विभागामध्ये समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे.

Gaikwad P.P.
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.११८ ठ. क्र. १५९
दि... २२।८।१५...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



रिपन हॉल येथे पासपोर्ट कार्यालय करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरामध्ये मेगा सर्किट डेव्हलपमेंट अंतर्गत रिपन हॉल येथे परिसर सुशोभिकरण करणेकरिता र.रु. ३.५० कोटी इतका निधी महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ (MTDC) यांच्याकडून प्रस्तावित असून त्यांच्याकडून काम करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सदर ठिकाणी काम करणेस मा. मनपा सर्वसाधारण सभा ठ.क्र. २९४ दि. ३०-१२-२०१४ ने मंजूरी मिळाली आहे. तसेच सदर ठिकाणी एम.टी.डी.सी. यांना काम करणेस तत्कालीन मा. आयुक्त यांनी दि. ३-१-२०१४ रोजी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. सदर रिपन हॉल येथे MTDC यांचेकडून पुढीलप्रमाणे कामे करणेत येणार आहेत. **१)** रिपन हॉल मजबुतकरण करणे **२)** टुरिस्ट फॅसिलिटी सेंटर करणे **३)** सिध्देश्वर तलावात बोट क्लब स्थापन करणे. **४)** डिस्प्ले एरिया, ऑफिसेस, कॉन्फरन्स हॉल फुडकोर्ट इ. **५)** पार्किंग, संरक्षक भिंत, सुरक्षित केबीन, टॉयलेट ब्लॉक करणे **६)** लँडस्केपिंग व MTDC सुचना केंद्र करणे. प्रस्तावात नमूद वस्तुस्थितीचा विचार होऊन शहरातील मध्यवर्ती ठिकाणी पासपोर्ट सेवा केंद्र रिपन हॉल येथे स्थापन करणे, त्यापोटी जरुर ते नियमाप्रमाणे होणारे भाडे आकारणे तसेच यापूर्वी MTDC यांचेकडून मा.मनपा ठ.क्र. २९४, दि. ३०-१२-२०१४ मधील ठरावाच्या अनुषंगाने फक्त रिपन हॉल इमारती मधील अंतर्गत कामे रद्द करुन इतर सर्व परिसरातील उर्वरीत कामे MTDC मार्फत करणेकामी मा. सर्वसाधारण सभेची अंतीम मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ९-७-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कायम/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ९५३ ठ. क्र. ९६०
दि. २२/१२/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मुंबई या मध्यवर्ती समितीतर्फे बालनाटय संमेलन भरविण्याची कल्पना पुढे आली मोठयाच्या नाटय संमेलनाप्रमाणेच बालगोपाळांचे बालनाटय संमेलन भरविल्यास बालनाटय चळवळीला उर्जितावस्था प्राप्त होऊन गती मिळेल हे महाराष्ट्रातील नाटयसमिक्षक अभ्यासकांचे मत शिरोधार्ह मानून संमेलनाचा घाट घालण्याचा निर्णय झाला. प्रतिवर्षी वेगवेगळया ठिकाणी हे संमेलन होणार आहे. त्यामुळे पहिले बालनाटय संमेलन भरविण्याची मागणी राज्यातील ८ ते ९ प्रमुख शहरामधून करण्यात आली होती. त्यातून मध्यवर्ती समितीने अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा सोलापूर उपनगरीय या शाखेच्या मागणीला प्राधान्यक्रम देत प्रथम पसंती दिली. अन् हे बालनाटय संमेलन भरविण्याचा पहिला मान सोलापूर नाटय परिषदेच्या उपनगरीय शाखेला मिळाला. सोलापूरकर म्हणून आम्हाला याचा सार्थ अभिमान वाटतो. बालनाटय संमेलन भरविण्याचा पहिला मान सोलापूरला मिळाला याचे सर्व शहरवासियांनी सर्व राजकीय पक्ष व शैक्षणिक संस्था, रंगकर्मी, व्यापारी वर्ग, उच्चविद्याविभूषित वर्गाने सोलापूर महानगरपालिकेने सहर्ष स्वागत केले आहे. उत्साहाने सर्व शहर संमेलनाच्या तयारीला लागले आहे. सोलापूर हे आपल्यासाठी नवे नाही इथली परंपरा, सांस्कृतिक घडामोडी व सोलापूरशी घट्ट नाळ जुळलेली आहे. म्हणून तीन दिवस चालणा-या या संमेलनाचे आम्ही सहर्ष स्वागत करीत आहोत. म्हणून अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मुंबई आयोजित सोलापूर येथे दि. २७ ते २९ नोव्हेंबर २०१५ कालावधीत भरण्यात येत असलेल्या पहिल्या बालनाटय संमेलनास सो.म.पा.च्या वतीने रक्कम रुपये २५ लाखाचे अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच सोलापूर शहरामध्ये अखिल भारतीय उर्दू साहित्य संमेलन समितीच्या वतीने अखिल भारतीय उर्दू नाटय संमेलन महाराष्ट्र राज्यात प्रथमच चार दिवसीय साहित्य संमेलन दि. २५ ते २८ डिसेंबर २०१५ या कालावधीमध्ये आयोजित करण्यांत आले आहे. या संमेलनासाठी देशभरातून अनेक नामवंत नाटककार, लेखक, दिग्दर्शक व कवी उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीची नाटके सादर करण्यांत येणार आहेत. सोलापूरच्या पुण्यनगरीत अखिल भारतीय उर्दू नाटय संमेलन आयोजित करण्यांत येत असून, साहित्यासह विविध विषयावर भरगच्च कार्यक्रम रसिकांना पहावयास मिळणार आहेत. सोलापूरात भरणा-या अखिल भारतीय उर्दू नाटय संमेलनात या चार दिवसात शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्नावर चिंतन व मनन होणार आहे. तरी या उर्दू नाटय संमेलनासाठी रक्कम रुपये २५ लाखाचे अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका